प्रकरण ३ रे

'वऱ्हाडी लोकगाथे' मधील स्त्रियांचे कौटुंबिक जीवन

प्रकरण ३ रे

'वऱ्हाडी लोकगाथेमधील स्त्रियांचे कौटुंबिक जीवन'

प्रस्तुत 'वऱ्हाडी लोकगाथा' या पुस्तकामध्ये कौटुंबिक जीवनावर आधारित काही गीते आहेत. त्यामध्ये एकूणच कुटुंबातील व्यक्ती, त्यांचे विचार, स्त्रियांना कुटुंबात असणारे स्थान, तिला मिळणारी वागणूक आणि तिची या सर्वांविषयींची मते, विचार यांचे दर्शन होते. त्यावरून स्त्रियांच्या कौटुंबिक व व्यक्तिगत जीवनाची कल्पना येते. कारण स्त्रियांनी अगदी जीव ओतून, आपल्या भावना गुंफून या गीतांची निर्मिती केलेली आहे. त्यामुळे साहजिकच स्त्री जीवनाचे चित्रणच यातून अधिक झाले आहे. हेच स्त्रियांचे कौटुंबिक जीवन दाखवण्याचा प्रयत्न या प्रकरणात करणार आहे.

स्त्री आणि पुरूष ही संसाररथाची दोन चाके आहेत असे म्हटले जाते. या दोन्ही जीवाच रूप निसर्गानेच त्यांना बहाल केलं आहे. या रूपामध्ये थोडफार साम्य असलं तरी त्यांचे स्वभाव, त्यांच्या वृत्ती यांच्यामध्ये फार मोठा फरक आहे. पुरूष हा अहंकारी, सतत बाहेर राहणारा, स्वत:चा कर्तेपणा मिरविणारा, इतरांना धाक दाखविणारा तर स्त्री म्हणजे प्रेमळ, घराचा उंबरठा न ओलांडणारी, नम्र, सर्वांना समजून घेणारी असते. ही परिस्थिती परंपरागत स्त्री पुरूषांची होती. आता याचे स्वरूप काहीसे बदलले असले तरी लोकगीतांकडे नजर टाकल्यास त्याचा अभ्यास केल्यास प्राचीन कालीन स्त्रियांच्या जीवनपध्दतीची कल्पना येते.

स्त्री जीवन हे अनेक नात्यांत बांधले गेलेले असते. नाती निर्माण करण्याचं काम मुख्यत: स्त्री करत असते. कारण ती एक जन्मदात्री असते. लग्नाआधी केवळ एक मुलगी व बहीण असणारी स्त्री लग्नानंतर आई, पत्नी, नणंद, भावजय, काकी, मामी, वहिनी अशा अनेक नात्यांत गुंतते. सासरी आल्यावर संसार करताना या सर्व नात्यांना सांभाळण्याची जबाबदारी तिचीच असते. त्याबरोबरच घरची सर्व कामे, खाणं-पिणं, मुलांच संगोपन, व्रतवैकल्ये देखील तिनच करावी अशी अपेक्षा. पण हे

करताना कुटुंबात स्त्रीला मात्र दुय्यमच स्थान असते. लहान वयात लग्न होऊन सासरी आलेल्या मुलीवर सर्व जबाबदारी पडल्याने तिचे शारीरिक व मानसिक हाल होत असत. सासरी आपुलकी मिळणे कठीणच. या परिस्थितीत एकच गोष्ट त्यांचा आधार बनली होती ती गोष्ट म्हणजे ही लोकगीते. म्हणूनच या गीतांच्याच आधारे स्त्री आपले दु:ख, भाव-भावना व्यक्त करीत असे. ही कष्टाची कामे करताना कधी आपल्या व्यथा सांगण्यासाठी, कधी विरंगुळा म्हणून स्त्रियांकडून या बहुसंख्य गीतांची निर्मिती झाली असावी.

या संदर्भात डॉ. शरद व्यवहारे म्हणतात की, ''स्त्री गीते हा स्त्री जीवनाचा आणि स्त्री जीवनाशी संबंधित असलेल्या एकूण विश्वाचा सहजपणे झालेला अविष्कार आहे. स्त्री जीवनाच्या आवडी-निवडी, त्यांची सुख-दु:खे, त्यांच्या भावभावना, स्त्री मनावर झालेले संस्कार, स्त्री जीवनातील आचार विचार, रूढी-प्रथा एकूण लोकजीवनात आणि कुटुंबात तिला असलेले स्थान आणि तिच्या मनातील खळबळ, उमाळा स्त्रियांच्या जीवनातून चित्रित झाला आहे. म्हणूनच स्त्री-जीवनाची मनाला मोहून टाकणारी भावरम्यता जशी या गीतात प्रत्ययास येते तशी मनात खळबळ माजवणारी स्पंदनेही त्यांतून ऐकावयास मिळतात. स्त्री जीवनातील अनेक प्रसंगाचे हृदयस्पर्शी चित्रण जसे त्यांच्या गीतात पाहावयास मिळते तसेच जीवनाकडे पाहण्याच्या तिच्या दृष्टीकोनाचे स्वरूपही लक्षात येते. जीवन जगत असताना स्त्रीने जोपासलेली जीवनमूल्ये आपल्याला कळतात. थोडक्यात स्त्री गीते म्हणजे स्त्री जीवनाची गाथा. स्त्री-गीते म्हणजे मनाला भावणारी भावगंगा.[१]

वरील सारा प्रपंच स्त्री गीताबाबत असल्याने लोकगीत म्हणजे स्त्री गीते असाही समज होण्याची शक्यता आहे नव्हे असाच समज काहींनी करून घेतला होता. पण खरे तर लोकगीते म्हणजे स्त्री गीतेच नव्हे तर त्यामध्ये पुरूष व लहान मुले यांचीही गीते समाविष्ट होतात. पण पुरूषांच्या तुलनेत स्त्री गीतांची संख्या विपुल आहे. याबाबत मात्र सर्वांचेच एकमत आहे. तसे पाहिले तर स्त्री गीते अधिक

असप्यामागे कारणही तसेच आहे कारण स्त्री ही मुळातच हळवी, संवेदनशील, श्रध्दाळू, भावनाशील असते. लहानपणापासून तिच्यावर केलेले संस्कार व तिची जडण घडण अशाच प्रकारे केलेली असते त्यामुळे समाज व कुटुंब यांच्या पाशात अडकल्याने तिच्या संवेदनक्षम मनाने या गीतांचे साहाय्य घेऊन आपल्या थकल्या भागल्या जीवाला दिलासा देण्याचे काम केले आहे.

प्रस्तुत 'वऱ्हाडी लोकगाथे' मध्ये वऱ्हाडी भागातील कौटुंबिक आशयाची काही गीते सामाविष्ट केली आहेत. यामध्ये अंगाई गीते, सासर-माहेर विषयक गीते, अहेव संकल्पना मांडणारी गीते, स्त्रियांमधील समभाव, भेदभावदर्शक गीते, कुंकू महात्म्य गीते, काही नातेसंबंधावर आधारित गीते सामाविष्ट केली आहेत. या गीतांचा अभ्यास केला असता वऱ्हाडी भागातील स्त्रीची कुटुंबातील स्थिती, तिचा दर्जा, मिळणारी वागणूक, लग्नाआधीच व लग्नानंतरच बदललेलं तिच जीवन व त्याबद्दलचे तिचे विचार या सर्वांचीच कमी-अधिक प्रमाणात कल्पना येते. हेच तिचे कौटुंबिक जीवन विशद करण्याचा येथे प्रयत्न केला आहे.

वऱ्हाड मधील स्त्रीच्या कौटुंबिक जीवनाचे चित्रण करीत असताना तिच्या जन्मापासून म्हणजे मुलगी असल्यापासून ते सासरी जाऊन आई होणे व आईची सासू होणे इथपर्यंतचा प्रवास वर्णिला आहे. या प्रवासामध्ये स्त्री-गीतांतील प्रत्येक ओवी म्हणजे एक भावचित्रच आहे असे वाटते. यामध्ये आई-वडिलांची मुली-मुलांविषयीची भावना, आई वडिलांविषयी मुलांना वाटणारे प्रेम, बहिण भावातील प्रेम, पतीविषयीच्या नाजूक प्रेमभावना, सासू, नणंद, भावजय, मामा, मावशी यांच्या विषयीच्या भावना, तसेच शेजारणीविषयीचे तिचे भाव हे सारे या गीतांतून प्रकट होत असतं. तेच दाखविण्याचा प्रयत्न येथे केला आहे.

सर्वात प्रथम मनाला भावते ती लोकगीतातील 'लेक'.

लाडाची लेक/मुलीच्या जन्माबाबतच्या भावना :-

''लोकगीतातील लेक खूपच लाडाची लाडकी असलेली दिसून येते. या लेकीबद्दल बोलताना लोकगीताला प्रेमाचं भरतं आलेलं दिसतं. तिची नाजूक-साजूक वर्णनं आपल्याला सर्वत्र विखुरलेली आढळतात. हया लेकीचं कौतुक करताना लोकगीतातील अकृत्रिम जिव्हाळा आपल्याला भारावून टाकतो. आता आवर्जून मुलीत व मुलात भेद करू नका असं वारंवार सांगितलं जातं व त्या पार्श्वभूमीवर ही लोकगीतातील लेक उठून दिसते.''[२]

तसं पाहिलं तर प्रागैतिहासिक काळापासून विदर्भात मातृप्रधान संस्कृती होती. त्यामुळे स्त्रियांना मानाचे स्थान होते. तसेच अंबा, रेणूका अशा कर्तृत्ववान स्त्रियांचे मातृदेवतेत रूपांतर झाले होते. स्त्रियांची परंपराही चांगली होती. हा झाला इतिहास. मात्र मुलीबाबतच्या काही ओव्या सोडल्या तर महाराष्ट्रातील इतर सर्वसामान्य स्त्रियांप्रमाणे तिचीही अवहेलनाच केली गेली. त्यामुळे स्त्री आपल्या गीतातून आपल्या व्यथाच मांडत आली तरीही विदर्भातील लाडक्या लेकीचे लाड कौतुक पाहिलं की आपल्यालाही तिथली लेक व्हावसं वाटेल.

आई लेकीला तळहाताच्या फोडाप्रमाणे जपते. कारण आईला खरं तर लेकीची आवड खूप असते. मुलगा हवा असं साऱ्या घराचं म्हणण असलं तरी तिच्या ठायी मुलगा-मुलगी समानच असतात. पण त्यातल्या त्यात लेक ही तिची मायबहिणही असते त्यामुळे तिच्याविषयीची ओढ अधिक वाटे. आईबरोबरच आईच्या नातेवाईकांना लेकीचा लळा असलेला दिसतो. लेक झाल्याबद्दल स्वत: आई म्हणते -

''लेकाच्या परीस लेकीच आवड मले
आंबर ह्या जीवाले'' किंवा
''लेक मागितला देवाजीनं लेक दिली
परसा परदेशी जीवा मायबहिन झाली.''

म्हणजेच मुलगी झाल्याबद्दल तिला विशेष आनंदही होतो आहे. त्यामुळे तिच्या रूपाच, गुणाचं, खेळाचं कौतुक करण्यात ती दंग होते.

''गोरी मायी लेक गोऱ्या वानावरी
सोभा देते बाई हिरवं गोंदण गालावरी''

''गोरी मायी लेक गोरी हनवटी
सोभा देते बाई कुळावर मेनपटी''

तिच्या खेळण्याचीही कितीतरी कौतुक वर्णनं आहेत.

''लाडाची लेक खियाले गेली लांब
हाती साकरेचा जांब तिचा मोत्यानं भरला भांग''

''लाळाची लेक खियाले गेली राती
पैंजनाची माती काळली दियाज्योती''

या लाडक्या लेकीचे सारे हट्टही ती पुरे करते. तिच्या आनंदात ती स्वत:चा आनंद, सुख शोधते.

''लाडक्या लेकीचा लाड मपल्या हाती
लावे परकराले मोती''

''लाडक्या लेकीनं छंद घेतला न्हायाचा
हंडा तापला न्हायाचा दारी चौरंग सोन्याचा''

तसेच ''लाडक्या लेकीच खेळनं मातीचं
नको तोडू बापा झाड चंदर ज्योतीचं''

अशी ही आई आपल्या लाडक्या लेकीला आपल्या मायेच्या पदराखाली झाकून ठेवण्याचा प्रयत्न करते. आईबरोबर आजीही नातीचं कौतुक करताना दिसते कधी तिला प्रेमाने सल्ला देते.

''लाडाच्या लेकीच नाव ठुजो बावली
कुरया केसांची डोळ्यावर सावली''

बाहुलीसारखी दिसणारी माझी नात आहे आणि कुरळ्या केसांमुळे तिला आणखीनच सौंदर्य प्राप्त झाले आहे. आजोळी आजीबरोबर लेकीचा मामाही लेकीचे खूप लाड करताना दिसतो. त्यामुळे हा मामा लोकगीताचे वैभव ठरतो.

ही आई मुलीच्या लहानपणीच तिच्या लग्नाची स्वप्न पाहते. आपण जसे तिचे लाड कौतुक करतो असेच प्रेमळ सासर तिला मिळावे, कर्तृत्ववान पती मिळावा ही तिची इच्छाही येथे व्यक्त करते.

''लाळाची लेक मायी लाळाले देईन बाई
अंगनी बागशाही लिवू टाकीन जवाई'' किंवा
''लाळाच्या लेकीवं नाव ठेवीन अष्टभुजा
जवाई पायीन अरध्या पुरथवीचा राजा''

मुलगी हे परक्याचं धन आहे ते परक्या घरी जाणार हे तिला माहित आहे म्हणूनच ती आपल्या सखी शेजारणीला सांगते की,

''आंगनी चाफा नको लावू मायबापा
लेकी जातीन परघरी तुमच्या फुलाचा काय नफा''
''आंगनी जाई नको लावू मायबाई
लेकी जातीन परघरी फुलांची रंदयी''

अशी ही आई लाडक्या लेकीसाठी खूप काही करते कारण तिला माहित आहे की, मुलगी जरी दूर असली तरी तिची माया, प्रेम अधिक आहे. म्हणूनच सासरी गेलेल्या मुलीचीही ती आतुरतेने वाट पहाते. तिला माहेरी आणायची संधी कधी मिळते म्हणून ती अधीर झाली आहे. मुलीच्या मायेविषयी सांगताना ती म्हणते –

''लेका तुयी माया साळेतीन रोज
लेकीच्या नेत्राचे आसू गयतीन रोजरोज''

लेक आणि आई यांचं लोकगीतातून दृष्टीस पडणार नातं फारच लोभस वाटत. हीच लाडाची लेक आपल्या आईवरही तितकच प्रेम करते. आईजवळ असताना खूप सुख

मिळालेली लाडकी सासरी याच सुखाला पारखी होते. त्यावेळी क्षणा-क्षणाला तिला आईची आठवण होत असल्याची दिसते. त्यामुळे माहेरच्या सुखद आठवणीत हरवून जाते व आईच्या प्रेमाचे गोडवे गाऊ लागते.

''माऊली माऊली दुनिया दावली
माऊलीन केली तयी हाताची सावली''
''मायबायी तुया घरी राहून राज केलं
तांब्याभर पानी हाती नायी देलं''
''मायेची माया कोनाले येत नायी
दुधाची तहान पाण्यानं जात नायी''
''या बोटाची सर त्या बोटाले येत नायी
आई इतकी लयऱ्या कोनी देत नायी''

अशा प्रेमळ शब्दातून, आठवणीतून आईच्या प्रेमाच्या गोष्टी सांगते. त्यातूनच आनंदाचे क्षण पुन्हा वेचू पाहते. ही माय-लेक म्हणजे वऱ्हाडमधील अतिशय सुंदर व लोभस नातं आहे असंच वाटतं. अशीच एक स्त्री या माय-लेकीच्या प्रेमाविषयी सांगताना म्हणते -

''माय-लेकीचं भांडण दुधाची उकयी
मावली काशीबाई मनाची मोकयी''
''मायबयनीच्या गोठी परसंगाच्या
दियाले घाला तेल वाती लावा रेशमाच्या''

कारण आई व मुलीच्या गप्पा आता रात्रभर चालतील त्यासाठी आधीच दिव्याला तेल वात घाला अशी म्हणणारी स्त्री मायलेकींना एकमेकांबद्दल वाटणारी ओढ प्रकट करते.

विदर्भातील स्त्रीच्या जीवनात आनंद, सुख देणारं हे नात आहे कारण कितीतरी उत्साहाने स्त्री या गीतातून मुलीबद्दलचे व मुलगी आईबद्दलचे विचार व्यक्त

करते. हेच विचार मनाला भुरळ पाडतात. या संदर्भात डॉ. प्रतिमा इंगोले म्हणतात की, ''लोकगीतातील लेकीच्या लाडाच्या नाना परी वाचताना आपणही वत्सल रसात चिंब भिजतो. आपल्याला मातृहृदयाची खरी ओळख पटते. संवेदनशील मातृहृदयाच्या ह्या विलक्षण दर्शनानं आपण भारावून जातो. अलवार नाजूक व सुकुमार प्रेमाच्या ह्या विभ्रमात चिंब भिजतो. मातृहृदयाचे नाना कंगोरे उलगडून दाखविणाऱ्या ह्या लोकगीतातील ओव्या म्हणूनच काव्यात्म वाटतात. आपल्या लेकीचा आगळा गौरव करतात. ह्या ओव्यांमुळेच ही लाडाची लाडकी तुशी मारून आपल्याही मनात शिरते व आपल्यालाही लोभ करण्यास प्रवृत्त करते. लोकगीतातील लेक अशी चिरंजीव प्रेमात न्हाऊन निघालेली दिसते. मातेच्या विशाल अंत:करणाची ओळख आपणास करून देते म्हणूनच वैशिष्टयपूर्ण वाटते व त्याचवेळी आकर्षून घेते.[३] म्हणूनच हे नाते फारच सुखी वाटते.

सासर माहेर विषयक भावविश्व :-

सासर व माहेर हे स्त्री जीवनाशी अधिक जवळीक असणारे आहे. लोकगीतांकडे नजर टाकल्यास बहुतांशी गीतांची निर्मिती सासर व माहेरातून झाली आहे असे दिसते. सासरच्या सासुरवासातून व माहेरच्या अतोनात प्रेमातून या गीतांची निर्मिती झाली आहे. मुलगी लहानाची मोठी होते व लग्नानंतर सासरी येते तेव्हापासून या सासु-सुनेच्या नात्याला सुरूवात होते. याचवेळी स्त्रियांना या गीतांची अधिक गरज भासू लागली. सासू आणि आई यामधील मोठी दरी पार करता करता स्त्री अर्धमेली झालेली दिसते. त्यातच मनातील दु:ख, व्यथा सांगण्यासाठी सासरी जवळचं मायेचं माणूस नसल्यानं गीताच्या माध्यमातून त्या आपल्या भावनांना मोकळी वाट करून देऊ लागल्या.

प्रस्तुत सासर-माहेरविषयक गीतांतून आई, वडील, बहिण, भाऊ, पती, सासू, नणंद, सासरा, भावजय, दिर या नात्यांबाबतचे स्त्रीचे विचार व्यक्त झाले

आहेत. त्यावरून स्त्रीचे या सर्वांबरोबरचे नाते कसे होते. तसेच तिचे कुटुंबातील स्थान लक्षात येते.

स्त्री जेव्हा सासरी येते तेव्हा सासरच्या सर्वच लोकांना ती आपलं मानत असते. त्यांच्याशी प्रेमाने वागू पाहते. सासूमुळेच आपल्याला हा पती मिळाला याची तिला जाणीव आहे. त्यामुळे कृतज्ञतेच्या भावनेतून ती म्हणते,

''सीता सासूबाई तुमचा सोन्याचा शेव
तुमच्या शेवाखाली जनमले महादेव''
''सीता सासूबाई तुमची सोनियाची मिरी
तुमच्या शेवाखाली जनमले शीरहरी''

सासू -सासरा यांना ती मान-सन्मान देते. त्यांना आपला आधार समजते कारण घरातील वडीलधाऱ्या माणसांना मान दयावा अशीच शिकवण तिला मिळाली असावी. त्यामुळे सासरच्या कोणत्याही कर्तव्यात ती कसूर करत नाही. मोठ्या अभिमानाने ती म्हणते

''सासू-सासरा जीवाले आसरा
जावूच्या पुतानं वाळा बांधला दुसरा'' किंवा
''सासू न सासरा तुयशीचं रोप
त्यायच्या सावलीत सुखाची झोप''
''सासरा माय देव सासू माय रतन
माहेरी जातो बाई करा जुळ्याची जतन''

सासू-सासऱ्यांविषयी प्रेमाचे उद्‌गार ती काढते. सासरच्या घराला ती आपलं मानत असल्याने माहेरी तिला करमत नाही.

लहान दिराला ती भाऊ मानते तर नणंदेला ती बहिण मानते. जावेबद्दलही तिला प्रेम आहे. तीही आपल्यासारखी परक्याची लेक आहे म्हणून तिच्याशी स्त्री आपुलकीने वागते.

''देर माये जेठ कंठीचे पदर

दरोज्यात उभी बयीन मायी मंदोदर''

''लहान देर लेकराच्या वानी

जेवता मांगे पानी''

''लहान माया देर हाका मारतो वयनी

खांदयावर शेव आमी साजतो बयनी''

अशा या दिराबद्दल ती चांगल्या गोष्टी सांगते आहे. ही वऱ्हाडी सून प्रत्येकाच्या नात्याप्रमाणे त्यांना मान देते. नणंद लहान असो मोठी असो तिचा मान राखते.

''देवाच्या देवळात एकली कशी जाऊ

वडील माझी जावू ननंदीले मान देवू''

घरामध्ये तिच्यासोबत असणारी जाऊ देखील तिला प्रिय वाटते. परक्याच्या लेकी आपण भांडून काय करायचंय. उगाचचं आपल्यात दुरावा निर्माण होईल कारण भावा-भावात कधीच ताटातूट होणार नाही.

''भांडतील भाऊ भाऊ जेवतील एका ताटी

आपून परायाच्या लेकी अबोला कशासाठी''

अशी ही वऱ्हाडामधील सून समंजस आहे, कृतज्ञ आहे. सासरच्या सर्वांना मान देऊन आपले कर्तव्य ती पार पाडताना दिसते. त्याचबरोबर सर्वात जवळची व्यक्ती म्हणजे 'पती' याला तर ती आपले सर्वस्वच मानते. ते तिचं कुंकू म्हणजे तिचं सौभाग्य आहे. पतीच्या सुखातच आपले सुख असते असे तिला सांगितल्याने ती पुढे त्यानुसारच वागते आहे. या कुंकवाला ती सर्वात मौल्यवान दागिना समजते. वऱ्हाडी स्त्रीची ही पतीविषयीची श्रध्दा आणि तिचे पतीविषयी विचार ऐकले की तिने पतीलाच परमेश्वर मानले होते असे वाटते तसेच पतीशिवाय तिचे सारे जीवनच व्यर्थ आहे असा समज तिने करून घेतला होता. कारण ती म्हणते -

''लेन्यामंधी लेनं लसन्या ताईत

कपायांच कुकू अवघ्या लेन्याचा नाईक''

''दुबळा भरतार नको करू हेळना

कपायाचं कुकू सोनं दिल्यानं मिळंना''

''लेन्या लुगळ्यानं नार दिसती माम्हीना

कुंकू भारी मोलाचा दागिना''

''कपाळाचं कुंकू अस तुयसीचं पान

जिकडे गेले राम तिकळे माये ध्यान''

हे तिचे विचार पतीविषयी भावना ऐकल्या की ही वऱ्हाडी पत्नी किती भोळी आहे, श्रध्दाळू आहे तसेच पतीला परमेश्वर मानण्याची तिची वृत्तीही दिसून येते.

सासरच्या प्रत्येकाला आपलं मानून त्यांना प्रेम देण्याची वृत्ती या वऱ्हाडच्या स्त्रीमध्ये पुरेपुर भरली आहे. सर्वांशी ती कृतज्ञतेने व्यवहार करते. सासरच्या सावलीत माहेर विसरण्याचा प्रयत्न करते पण त्या बदल्यात तिला हवे असणारे प्रेम मिळत नाही. कारण लग्न करून सुनेला घरात आणलेलं दिसत मात्र परकी-परकी म्हणून तिला खूप हिणवलं जातं. तिची, तिच्या प्रेमाची अवहेलना केली जाते. प्रत्येकाकडून तिला नित्य अपमानाला बळी पडावं लागतं. सासू आपला सासूपणा मिरविणारच या वृत्तीसारखी सुनेपुढे उभी ठाकते.

क्वचित प्रसंगी काही गीतांतून सासूच्या प्रेमळ वागणूकीबद्दल सून सांगते सुनेबद्दल सासू म्हणते -

''सुनेला सासूरवास करू व कशासाठी

मळ्यात मेथी टाकली नफ्यासाठी''

''सुन साईत्री नको झाळू अंगनवाळा

सोन्याचा तवा चुळा त्यावर बसतो धुरळला''

असे म्हणून तिच्यावर प्रेम असल्याचा, तिची काळजी घेतल्याचा बहाना करते. एरव्ही मात्र सुनेचे खूप हाल करते. सासू सुध्दा सुनच असते पण हे ती विसरलेली असते.

सासूचा सासुरवास :-

सासू-सुनेचं नातं फार जुनं आहे. याचे चित्रण अनेकांनी केले आहे. बऱ्याच लोकगीतातून हे चित्रण पाहायला मिळाले आहे. महाराष्ट्रातील इतर ठिकाणच्या लोकगीताप्रमाणेच वऱ्हाडी सूनही सासरवासाबददल आपली व्यथा मांडते. घरातील सासूची जागा सुन घेते तेव्हा सासू सुनेचा राग करू लागते. याच रागाचं रूपांतर सासूरवासात होते. अशावेळी सुनेचे फार हाल होतात. नवं घर, नवी माणसं त्यातच सर्वांची मते सांभाळणे, कामाचा त्रास यामुळे थकलेली ही सुन या गीतांतून आपले दु:ख सांगू लागली. जात्यावर बसल्यावर आपला सखा ईश्वर, परमेश्वर आहे असे समजून ती ओव्या गात असे. जात्याला ईश्वर मानण्याच्या वृत्तीतून ईश्वर हाच आपला आधार आहे अशीच तिची भावना झालेली दिसते. म्हणूनच कदाचित ती जात्यासमोर आपली व्यथा मांडत असावी.

आपल्या आई-वडिलांच्यासाठी स्त्री सासरी नांदत असते त्यांना कोणी नावे ठेवू नये म्हणून होणारा त्रास सहन करते. सासरबरोबर माहेरच्याही प्रतिष्ठेला ती जपताना दिसते.

''सासूचा सासरवास सोसला जीवावरी
पित्याच्या नावासाठी रात काढली शेतावरी''

''सासूचा सासरवास ननंदाचे टाले टोले
एका मयन्याच्या पोटी काकन झाले ढिले''

कामाच्या त्रासाने व सततच्या बोलाने तिचं मन दु:खाने भरून गेल आहे. कुणा शेजारनी जवळ बोलायची देखील भिती असे.

''बोलशील बोल बया भिती पायशील कसून
सागाचे लाकूड झिलपी निघते तासून''

हा सासूचा सासूरवास तिला सहन होत नाही काही अंशी ती विरोध करताना दिसते.

''सासूचा सासरवास मनाला झोंबतो

त्याईच्या हाताखाली पिलू वाघाच नांदते''

''एवढा सासरवास नोको करू आत्याबाई

नादारीच्या पायी बंधू माया येत नायी''

पण तरीही ती मनाला समजूत घालते. माहेरी आलेली नणंद दोन दिवसाची पाहुणी आहे हे माहित असल्यामुळे

''सासूचा सासरवास नंदीची लावनी

दिळ दिसाची पाहुणी उदया जाईन निगुणी''

असे ती म्हणते पण तरीही या दु:खाची बोच तिच्या मनाला लागते. तिवं मन उदास होत आणि

''सुटलं वारंपानी, झाडाले नाई पानंऽऽ

जंगलच्या पाखराचं उदास झालं मनऽऽ''

अशी तिची अवस्था होते. सासूरवासाच्या या वातावरणात तिला आपल घर जंगलासारखं वाटत. जंगलातील एकट्या पडलेल्या पाखरासारखी तिची अवस्था होते त्यावेळी मात्र तिला आईची आठवण येते. पण ते दूर असल्यामुळे त्यांना या त्रासाची कल्पना ती देऊ शकत नाही.

''एवढा सासरवास जीव उबगला माया

दूर मायबाप निरोप धाडू कसा''

स्त्री इतकी अगतिक झालेली दिसते. सासूचा, घरातील इतर व्यक्तींचा त्रास तर ती सहन करतच असते. मात्र ज्याच्यासाठी मुलगी सासरी येते त्या पतीचेही प्रेम मिळाले नाही तर तिला जगणेच कठीण होऊन बसते. कारण पतीशिवाय स्त्रीला शोभा नसते. पतीशिवाय स्त्रीजीवन व्यर्थ आहे असा म्हणणारा समाजच असतो. त्यामुळे स्त्रीला माहेराची, तेथील व्यक्तींची, त्यांच्या प्रेमाची आठवण होते.

''मायेवाचून माया नायी सजनाले

चेतला डोंगर पानी नायी इजोयाले''

''जिकडे जाशील देवा तिकडे कष्टाचं धन

बाप बया झाळ इसाव्याचे दोन''

जी काही विश्रांती, जे काही प्रेम मिळणार ते आईवडीलांजवळच त्यामुळे तिचे वेडे मन पुन्हा माहेरची धाव घेऊ लागते. माहेरची आठवण आल्यावर एकेक प्रसंग तिच्या डोळ्यासमोर उभे राहतात. मग माहेरी कधी जायला मिळेल? आई कधी भेटेल? भाऊ कधी येईल? असे प्रश्न तिच्या डोळ्यासमोर उभे राहू लागतात. मग कधी आई कधी वडील तर कधी प्रेमळ भावाची आठवण ती काढते. त्यांच्या येण्याची तर ती आतुरतेने वाट पाहू लागते. यातूनच तिच्या माहेराबद्दलच्या अनेक ओव्या व्यक्त झाल्या आहेत.

माहेरची ओढ व्यक्त करणाऱ्या ओव्या :-

भावाविषयीच्या भावना :-

एकंदरीत पाहता वऱ्हाडी लोकगीतातून बहिण-भावाच्या नात्यावर बहुसंख्य ओव्या दिसतात. वऱ्हाडी स्त्रीने भावाच्या व बहिणीच्या प्रेमाचे अनेक रेशमी पदर उलगडून दाखवले आहे. भावाबद्दल तिला आधीच खूप प्रेम आहे त्यात सासरी गेल्यावर हा भाऊ बहिणीवर अधिकच प्रेम करतो, तिची विचारपूस करतो. तिला सणावाराला माहेरी न्यायला येतो. त्यामुळे भावाच आगमन म्हणजे सुखाची चाहूलच तिला वाटते. म्हणूनच ती या सुखाची वाट पहात असावी. तिच्या या दु:खद जीवनात तिला माहेरी दोन दिवस जाणे एवढाच विरंगुळा सुटका वाटत असावी.

नववधुला प्रत्येक सणाला म्हणजे दिवाळी, दसरा, संक्रांत, पंचमी, गौरी गणपतीला माहेरी आणण्याची रीत वऱ्हाडी भागातही असल्याची दिसते. त्यामुळे नववधू भावाची वाट पहाते. कारण दिवाळी-दसरा जवळ आलेला असतो पण त्याआधीच ती आतुर झालेली दिसते.

''दिवायी दसरा कारतीकचा मयना लांब

सावया बंधुराया कई येशीन मले सांग''

''दिवायीचा मयना जगाचे येतील भाऊ

पाठच्या बंधूची वाट किती पावू''

''किती वाट पाहू बाई पोया पितरापासून

बंधुंचे नायी येनं दिवायी वाचून''

इतक्या आतुरतेने ती भावाची वाट पाहते इतकेच नव्हे तर भाऊ येणार तेव्हा त्याच्या आवडीच्या शेवया करायच्या त्याची तजवीज ती करून ठेवते.

''दूध अन शेवया ठेवतो कोऱ्या डोयन्यात

माझे गं बंधूराज येती कारतिक मयन्यात''

भाऊ येताना रिकाम्या हाती येणार नाही याची तिला खात्री आहे म्हणूनच बंधूच्या साडी-चोळीची तिला ओढ आहे. आपली ही ओढ ती शेजारणीला सांगते व तिला विचारते की -

''सेजारीनबाई दिवाई कईची

वाट मी पायतो बंधुच्या चोयीची''

तसेच ती सांगते की,

''मावसीचा लेक मावसभाऊ येते

उिवायीले नेते चोई बुगळ्याची घेते''

त्याची वाट पहाताना ती ओव्या गाते आणि गाता-गाता म्हणते की,

''घागरीचं जातं ओसरी रोवू नये

भावाच्या बयनीन मुक्यान दवू नये''

म्हणूनच की काय जात्यावर बसल्यावर ती सतत ओव्या गात असावी. भावाची प्रेमळ बहीण भावाशी कधीच भांडत नाही क्षणाचं भांडण झाल्यावर लगेच ते विसरूनही जाते कारण

''बयीन भावाचं भांडन भातक्याचं

भाग्याच्या मायबाई मंदी झाळ साकरेचं''

भावाच आपल्या सासरी येणं हा स्त्रीला आपला अभिमान वाटतो कारण जेव्हा शेजारणी विचारतात तेव्हा मोठ्या अभिमानाने ती भाऊ आल्याचं सांगते

''पुसलीन आयाबया शेला कुनाचा खुटीले
पाठचा बंधुराज आला व भेटीले''

या भावाची ती काळजीही तितकीच घेताना दिसते.

''उनायाचं उन तपते लायीलायी
बंधू गेले गावा छतरी नेली नायी''

तसेच भाऊ देखील बहिणीच्या सुखदु:खात तिची विचारपूस करतो तिला आधार देतो बहिणीच्या दु:खाने तोही व्यथित झालेला दिसतो.

''बयनीचा सासुरवास भुवाच्या कानी गेला
वाटीवरचा झिरा भाऊ पानी नायी पेला''

सासरी गेलेल्या बहिणीचा भाऊ हाच पाठीराखा असतो. त्यामुळे प्रत्येक बहिणीला एक तरी भाऊ असावा असे स्त्री म्हणते. मात्र जिला भाऊच नाही ती मात्र या सणांवेळी व्याकुळ होते. तिचं मन भरून येते. पाठच्या भावाशिवाय माया नाही. भाऊ असता तर तोही न्यायला आला असता या विचारात असताना शेजारणीचा भाऊ आल्यावर ती म्हणते

''शेजीचा भाऊ बाई घळी घळी येते
जीवाले नायी भाऊ किती अंतर दुखते''

''शेजारणीच्या भुवाले भाऊ म्हनलं दाटून
पाठीच्या भुवायाची सर येईना कुठून'' तसेच

''लेक लेक करता लेक होईन पोटचा
पुरथवी धुंडता बंधू मिळेना पाठचा''

अशी व्यथा बहीण व्यक्त करते. अशा प्रेमळ भावाविषयी सांगता सांगता भावाची पत्नी म्हणजे भावजय हिच्या विषयी देखील प्रेमभाव व्यक्त करते. कधी कधी

भावजयीच्या वाईट वागणुकीबद्दलही सांगते पण त्यामुळे दु:खी न होता उलट भावाचा-भावजयीचा संसार सुखाचा होऊ दे असा आशिर्वाद देते.

भावजयी विषयी भावना :-

प्रेम करणारी भावजय ही तिला मायबहिणीसारखीच वाटते म्हणून ती म्हणते

''वाट मी पायतो दुरच्या देशाची शिदोरी इटली
आई बहिनीच्या सारची भावजयी भेटली''

कधी-कधी ही स्त्री भावापेक्षा भावजय प्रेमळ आहे असही म्हणते.

''भावाच्या परीस भावजय मयाची
जीवाले वाटते नायी अंतर दयायची''

''भावाच्या परीस भावजय मोहन
शेल्याच्या पदरी चोई घातली शिवून''

''भाऊ घेतो चायी रूपयाची कायीसायी
सोन्याचा सुईदोरा टीप मारे भावजयी''

अशा या भावजयीबद्दल व्यक्त केलेल्या भावनेतून त्यांचे परस्परांविषयीचे प्रेम दिसून येते तर काही वेळा भावजयी नणंदेचा रागराग करते.

''भाऊ म्हणे बयनीले करा रोटी
बोलली भावजय गहू जमिनीच्या पोटी''

''भुकई लागली मायबाई नायी घरी
कोनाच्या भावजया जीव गेला येरझारी''

आईशिवाय माहेरची उब नाही याची स्त्रीला जाणीव होते. भावानं प्रेमानं आणलेली चोळी बहिणीला प्रिय असते मात्र ती घेतानाही भावजयी मागे पुढे पाहते.

''भाऊ गेला हाटा भावजयी मारे हाका
तुमच्या बयनीले उच्ची चोयी घेऊ नका''

हे ऐकल्यावर स्त्रीचे मन उदास होते, दु:खी होते. मात्र तेव्हा भावाच्याकडून कोणत्याच देण्याघेण्याची अपेक्षा ती ठेवत नाही. त्यांनी सुखाचा संसार करावा एवढच म्हणून जाते.

''भाऊ घेतो चोयी भावजयी रागराग
चोयीले लागो आग जोळ्यानं नांदा दोघं''

अशी ही वऱ्हाडमधील स्त्री आपल्या भाव-भावजयीविषयीच्या नात्याविषयी आपले अनुकूल मत सांगते. ही स्त्री प्रेमळ आहे, कृतज्ञ आहे म्हणूनच भावजयीला किंवा भावाला ती प्रत्युत्तर करत नाही. कारण माहेरच्या आई-वडीलांबरोबर भाऊ - भावजय हेच तिचं वैभव आहे अस ती समजते. त्यांच्या जोरावरच ती माहेरचा मोठेपणा सांगत असते. सासर कितीही मोठ असल तरी माहेराचं वैभव ती मोठ्या तोऱ्यानं सांगते आहे.

''कितीक सांगु माया माहेराले बळाई
गळीच्या बुरूजावर वाघ खेळतीन लळाई''
''काय सांगू बाई माया माहेराची चाल
भावजया धुतील पाय पावलं करतील लाल'' तसेच
''बंधू माया भावाचा वाळा हाये टोलेजंग
रानी मामीबाई सडा टाके वाकून''

अशी ही माहेरची बढाई सांगताना माहेरी गेल्यावर होणाऱ्या स्वागताचे गुणही ती गाते.

''माहेरी जातो बाई भाऊ भाचे पाहासाठी
चार भावजया पाय धुन्याची करी दाटी''
''माहेरच्या वाटी भाऊ भाचा येते
भाच्याच्या डोईवर शिदोरी डोल देते''

अशी प्रेमळ वागणूक देणारी माणस असल्याने एका रात्रीचं माहेरही तिला गोड वाटतं आहे.

''माहेरी जाईन रातभर रायीन
मायबाईचे लाल सुखी नांदता पाईन''

माहेरचाच आधार ती शोधते आहे.

''वैतागलं मन मनाले कुठं नेवू
आम लक्ष्मना हायेत माये भावू''

अशा या पाठीराखा भावाला उदंड आयुष्य लाभो यासाठी ही बहिण देवाला मागणं मागत असते तसेच आपल्या सखीला सांगते पहाटेच्या प्रहरी झोपू नको तर भावासाठी आपण ओव्या गावू.

''पहाटच्या पारामंदी नोको गळनी झोपी जाऊ
तुया भाचा बंधवाले आयुखाच्या ओव्या गाऊ''

मुलीच्या आई विषयीच्या भावना :-

सासरच्या सासरवासात मुलीला आईची प्रकर्षानं आठवण होते. त्यावेळी आईजवळ असतानाचे दिवस तिच्या समोर येतात. फुलपाखरासारखं रंगीबेरंगी आयुष्य तिनं जगलेलं असल्यानं आता ही मुलगी सासरच्या त्रासानं थकली आहे तेव्हा ती म्हणते

''माय तुया घरी राज केलं रावणाचं
आयी उचललं पुळचं ताट जेवणाचं''

''सासूचा सासूरवास कसा कटू माय
एवळं गिन्न्याव माय हुरदयात हाये''

''लंबे लंबे बाल बालाची वज नायी
डोंगरी शिकेकाई सव लावली मायबाई''

अशा या प्रेमळ मायीविषयी ती अनेक आठवणी सांगते. त्याचबरोबर वडिलांच्या प्रेमाचाही ती येथे उल्लेख करते. वडील तसे फारसे कुटुंबाकडे लक्ष न देणारे असतात म्हणजेच मुलांचा सांभाळ स्त्रीकडे असतो. त्यामुळे मुलांना आईची ओढ अधिक असते. येथे मात्र आपल्या पित्याचे मुलगी गोडवे गाताना दिसते त्यामुळे प्रत्येकाचे प्रेम जाणणारी व त्याची आठवण ठेवणारी ही वऱ्हाडी मुलगी मनात घर करते.

''माय तुयी मया घराच्या दारात
बाबाजीची माया आले डोंगर शोधत''

''माय तुयी मया चोळी बांगळीची
बाबाजीची मया हाती घळी लुगळ्याची''

''मायबाईची चाई जात्याचं झाळनं
पित्यानं दिली गाय वाळा भरला वासरानं''

''निंबाच्या निबोन्या निंबाले जड
बावाजीले लेकी गाडे''

अशी वडीलांविषयी प्रितीची भावना किंवा वडिलांचे प्रेमळ वागणे ती गीतांतून मांडते. आई वडील तिचे मोठे आधार, वैभव त्यामुळे त्यांना ती देवत्वाचे स्थान देते.

''बाप माया राजा काशी खंडनीचा वळ
यशोदाबाई मायी पानी त्रिगुनीचं गोळ''

अशी कृतज्ञता ती व्यक्त करते.

सखी शेजारणीविषयी भावना :-

वऱ्हाडी लोकगीतांत स्त्री आपल्या भावना ओवीगीतातून व्यक्त करताना शेजारणीचा उल्लेख करते. मायेच्या माणसांना दूर सोडून आल्यावर, सासरचा सासरवास सहन करायला ही शेजारीण बळ देत असते. सुखदु:खाच्या गोष्टी तिच्याशी केल्याने सुनेला मन हलक झाल्यासारखं वाटत असावं. तसेच सुनेच्याविषयी ही शेजारीण आपुलकीने चौकशी करते म्हणूनच कदाचित ही

गही तिला कुटुंबाच्या अगदी जवळची वाटत असावी म्हणून सुन म्हणते,

''शेजारीन आली घरा, मी निगाली अंगना

अन्याव बाराचा सांगना''

''सेजारीन आली घरा, मी निघाली हासत

अन्याव बाराचा पुसत'' असे ती आनंदाने सांगते. ही शेजारीण मुलांबाळांकडेही आपलेपणाने लक्ष देते त्यामुळेच सुन देखील तिला हक्काने ही-

''शेजारीनबाई माह्या घराकडे जाजो

पायावर पानी घेजो, माया किसनाले पायजो''

''शेजारीन बाई माह्या घराकडे देख

पायन्यात अभिषेक, वसरी मैना लेक''

सुनेला सासरची शेजारीण कधी कधी मोठा आधारच वाटते.

स्त्रीच्या या कौटुंबिक जीवनामध्ये मुलगी, सून, पत्नी व त्यानंतरची अवस्था आई होण्याची येते. त्यामुळे इतर सर्व नात्यासंबंधी तिच्या भावना आपण तल्या पण तिचे आई होणे ही तिच्या नव्या कुटुंबाची चाहूल असते तेव्हा ही अंगाई व पाळणा गीताच्या संदर्भात तिच्या भावना व्यक्त झाल्या आहेत. येथे परामर्श घेतला तरी स्त्रीचे खरे सुख कशात आहे हे वऱ्हाडीचे स्त्रीने बतीत सांगण्याचा प्रयत्न केलेला दिसतो.

मुलांबाबतच्या भावना :-

त्रीजीवन म्हणजे संघर्षच असतो पण या संघर्षमय जीवनात एक सुखाची हणजे आई होणे. ईश्वराने स्त्रीला एक अमूल्य भेट दिली आहे ती म्हणजे याची. त्यामुळेच की काय प्रेम, माया, सहनशीलता केवळ स्त्रीमध्ये असते.

आई ही आई असते मग ती कोणत्याही ठिकाणची आई असो ती प्रेमाची, त्यागाची मूर्तीच असते. अशी आई ही वऱ्हाडी लोकगीतांतूनही दिसून येते.

वऱ्हाडी भागातही मुलाच्या जन्मानंतर बारसे म्हणजे नाव ठेवताना पाळणे म्हणण्याची प्रथा आहे. हे पाळणे म्हणताना स्त्री देवादिकांच्या उपमा देत त्यांचे दाखले देत बाळाचे गुणगाण गाते, कौतुक करते. त्याच्या बाळलीलांचे कौतुक करते, स्वत:ही त्याचा आनंद घेते व इतरांनाही आपल्या गीतांतून हा आनंद घेऊ देते.

देवदेवतांचे गुण आपल्या बाळाच्या अंगी यावेत म्हणून प्रार्थना करते. बाळाला दृष्ट लागू नये म्हणून नाना तऱ्हेचे उपाय करते.

''बाळाले झाली दिठ। उतरवते मीठ
मिठाची झाली लाही । चंद्र कोमावला बाई

या बाळावर ती खूप प्रेम करते. त्याबरोबरच ती परमेश्वर आपल्या व बाळाच्या पाठीशी आहे अस समजते.

''बाई एकुलता एक, जसा पान्यातला लवू
बाळाले माहया किती खालीवर पाहू''
''तानं तानं करता । तानं आलं माहया घरी
त्याले राखन शिरहरी।।''

अशा अगदी प्रेमाने ती त्याचा सांभाळ करत असते. या मुलाच्या आगमनानं ती आपलं दु:ख आपल्याला होणारा त्रास विसरून जाते. बाळाचे खेळ पाहण्यात, त्याचे हट्ट पुरविण्यात तिला एक वेगळाच आनंद मिळतो. म्हणूनच स्त्री आई होणे हा एक सुखाचा क्षण तिच्या जीवनात येतो.

स्त्रीला आपल्या भावाविषयी फारच जिव्हाळा वाटत असतो हे पाहिलेच आहे हाच भाऊ आपल्या बाळाचा मामा बनतो तेव्हाही बहिणीबरोबर तिच्या बाळाची काळजी घेतो. त्याचे हट्ट पुरवितो, त्याचे लाड कौतुक करतो म्हणून स्त्री म्हणते

''आगळं टोपरं , आजीनं केला सामा

कुंची घ्याया गेला मामा''

''हावसीचं लेन, मावशीन केल्या बाळ्या

मामा घेतो कोपरवाऱ्या''

''भंगी टोपरं कुंची गोंडयानं येठली

हौस माम्यानं फेडली''

असा हा मामा प्रेमाचा ठेवा मानला गेला आहे. लोकगीतात हा मामा पदोपदी भेटतो. स्त्रीच्या माहेरी हा भाऊ प्रेम देतोच पण सासरीही तिचा आधार बनून राहतो. त्यामुळे बहिणीची भावाविषयी आणि भावाची बहिणीविषयी प्रिती पाहिली की मन भरून येत.

अशी ही वऱ्हाडी स्त्री अनेक नात्यांतुन अनेक भूमिका स्वीकारून आपल्या समोर उभी राहते. कुटुंबातील आई, मुलगी, बहिण, सून, सासू या भूमिका पार पाडताना तिची ससेहोलपट झालेली आपण पाहिली आहे. तरीही सासरी प्रत्येकाविषयी प्रेमाने संवाद साधत, आपली कर्तव्य ती पार पाडताना दिसते. पण बऱ्याचवेळा एक स्त्री म्हणून तिला हिणवले जाते घरातील कोणतीच व्यक्ती स्त्रीला मानाचं प्रथम दर्जाचं स्थान देत नाही. सतत तिला पुरूषांच्यापुढे नमत घ्यावं लागतं. कुटुंबात भलेही तिने सर्व जबाबदाऱ्या पार पाडल्या असतील पण तिचा दर्जा हा दुय्यमच राहिलेला आहे असे दिसते.

कारण कधी-कधी पिता म्हणविणारा हा पुरूष स्त्रीच्या म्हणजेच मुलीच्या जन्माविषयी नाराज होतो. तिच्या मरणाच्या गोष्टी करायलाही तो घाबरत नाही त्याचेही चित्रण करायला स्त्री विसरली नाही हेच तिचे विशेष होय.

''बाप म्हने लेकी तुमी मरावे पापीनी

संसारी येऊन जीवा लावली धोकनी''

''बाप म्हने लेकी लहानपनी मेली नाई

जहराची पुळी मले वान्यानं दिली नाई''

असे म्हणणारा बाप हा याच पुरूषप्रधान संस्कृतीचे प्रतिनिधीत्व करणारा आहे त्यावरून पुरूषांचा किती दरारा होता हे दिसून येते पण बऱ्याच ओव्यावरून स्त्री याचा गुलाम झालेली दिसते पण ती समंजस वाटते, प्रेमळ वाटते एकूणच तिचे वर्तन कृतज्ञतेचे प्रामाणिक वाटते. पण कर्तृत्ववान जिजाबाई, कालिदास लिहिणारी विजयांका, महाराणी ताराबाई, धवळे लिहिणारी महदंबा यांची परंपरा असलेल्या या विदर्भात स्त्री बरीच मागे असलेली दिसते. त्या काळाचा विचार केला तर अशी परिस्थिती असणे साहजिकच आहे.

एकूणच सर्व प्रकारची गीते पाहिली की त्यातील विविधता लक्षात येते. कौटुंबिक गीतातूनही अनेक नातेसंबंध समोर येतात. या गीतांतून मांडलेली वास्तवता बऱ्याच वेळा मन हेलावून टाकते. अतिशय प्रगल्भपणे त्यातील आशय समोर येतो व मनाला भावतो त्यामुळे हे सर्व व्यक्त करणारी स्त्री श्रेष्ठ वाटते. म्हणूनच वऱ्हाडी स्त्रीचा कौटुंबिक दर्जा जरी दुय्यम असला तरी ती प्रथम दर्जाची वाटते कारण या गीतांतून केवळ तिचे कौटुंबिक जीवनच समोर येत नाही तर तिच्या भावना, विचारही कळतात. आणि हे विचार गीतांतून का होइना पण व्यक्त करण्याचे धाडस तिच्यापाशी आहे ही देखील एक महत्त्वाची बाब म्हणता येईल.

<u>समारोप</u> :-

प्रस्तुत प्रकरणामध्ये कौटुंबिक आशयाच्या गीतांतून कौटुंबिक स्त्रीचे जीवन मांडण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामध्ये तिचं जगणं, राहणं तिचे विचार, भावना, तिच्या कांही श्रध्दा या सर्वांवर प्रकाश पडतो. प्रत्येक नात्याच्या भूमिका पार पाडताना तिचे प्रामाणिक व्यक्तिमत्व समोर येते. स्त्रीच्या आजुबाजूला घडलेले हे प्रसंग असल्याने ती अनुभवांची खाण वाटते. तिच्या या खाणीतून अनुभवांचे शब्द शिंपले बाहेर पडल्याचे दिसते.

माहेरचं जीवन म्हणजे सुखच सुख असते व सासरी मात्र ती कशी भरडली जाते. यावेळी माहेरच्या सुखद आठवणीत ती हरवून जाते. तसेच तिच्या

बालपणापासून तिच्या आई होण्याच्या प्रवासापर्यंतच सर्व नात्यांच्या भूमिका त्यांच्याबद्दलच्या भावना यात व्यक्त झाल्या आहेत. त्यामुळे या पारंपारिक स्त्रीची मानसिकता समजते.

आजची वऱ्हाडी स्त्री या पारंपारिक जीवनाच्या बरीच पुढे गेली असेल पण तिची पाळेमुळे ज्या समाजात रूजली वाढली त्या समाजाचे दर्शन मात्र या लोकगीतांतून झालेले दिसते तसेच तिच्या कौटुंबिक जीवनाचा आलेखच समोर उभा रहातो.

पुढील प्रकरणात स्त्रियांच्या सामाजिक जीवनाचा अभ्यास करणार आहे.

<u>संदर्भ</u> :-

१) 'मराठी स्त्रीगीते', डॉ. शरद व्यवहारे, प्रतिमा प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, २ ऑक्टो. १९९१, प्रकरण ३, पान नं. ९४.

२) 'बयनाचे बोल', डॉ. प्रतिमा इंगोले, सुगावा प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती १९९८, पान नं. ४५.

३) तत्रैव, पान नं. ५०.